# प्रकरण - ७ वे
# उपसंहार

या प्रकरणामध्ये प्रबंधातील प्रकरणांचा थोडक्यात परामर्श घेतलेला आहे. तसेच संशोधनाचे निष्कर्ष मांडलेले आहेत. महाराष्ट्रात ग्रामीण भागातील नेत्यांनी सहकार चळवळीच्या माध्यमातून आपापल्या जिल्ह्यांचा विकास साधला. यामध्ये ज्या नेत्यांनी महाराष्ट्राच्या विकासास हातभार लावला, त्यातील काही निवडक नेत्यांची सविस्तर माहिती घेतली आहे. या नेतृत्वाने सहकाराच्या माध्यमातून ग्रामीण भागाचा विकास केला; पर्यायाने महाराष्ट्राचा विकास झाला. प्रामुख्याने पुणे जिल्ह्याच्या विकासात अण्णासाहेब मगर यांचे योगदान महत्त्वाचे समजले जाते. पुणे जिल्ह्याच्या विकासामध्ये अण्णासाहेबांनी अनेक सहकारी संस्था उभारल्या. प्रस्तुत प्रबंधामध्ये अण्णासाहेब मगर यांच्या शैक्षणिक कार्याबरोबरच सामाजिक व सार्वजनिक कार्याची माहिती घेतलेली आहे. तसेच अण्णासाहेबांच्या राजकीय कारकीर्दीचा स्वतंत्र प्रकरणामध्ये अभ्यास केलेला आहे. पुणे जिल्ह्यामध्ये अण्णासाहेब मगर यांनी ज्या संस्था स्थापन केल्या त्या सर्व संस्थांचा सविस्तर अभ्यास करण्यात आला आहे. या सर्वांची माहिती सारांशरूपाने खाली देण्यात आलेली आहे.

## सारांश

'प्रकरण पहिले : विषयप्रवेश' यामध्ये प्रस्तुत प्रबंधाची रूपरेषा देण्यात आलेली आहे. तसेच संशोधन पद्धती व संशोधन साधने यांचे स्वरूप स्पष्ट केलेले आहे.

'महाराष्ट्रातील ग्रामीण नेतृत्व आणि सहकार चळवळ' असे दुसऱ्या प्रकरणाचे शीर्षक आहे. या प्रकरणात महाराष्ट्रातील ग्रामीण नेतृत्व आणि सहकार चळवळीविषयी माहिती देण्यात आलेली आहे. भारताची संस्कृती ही कृषिसंस्कृती आहे. भारतातील ७०% जनता ही शेतीवर अवलंबून असल्यामुळे येथे शेतीविकासाला विशेष प्राधान्य दिले जाते. भारताचा सर्वात मोठा भाग हा खेड्यांचा आहे. त्यामुळे खेड्यांचा विकास हा प्रामुख्याने शेतीवर अवलंबून आहे. एकोणिसाव्या शतकात भारतामध्ये खेडी आणि शहरे यांमध्ये फार मोठी तफावत होती. त्यावेळी खेड्यांमध्ये शिक्षणाच्या संधीही उपलब्ध नव्हत्या. ब्रिटिश अंमलात शिक्षणाच्या ज्या नवीन संधी उपलब्ध होऊ लागल्या, त्यामुळे थोड्या प्रमाणात का होईना

समाजामध्ये लोकशाहीचा व्यवहार रुजू लागला. त्यावेळी महाराष्ट्रातील नेतृत्वाचे स्वरूपही बदलू लागले. तेव्हा सत्यशोधक चळवळ, ब्राह्मणेतर चळवळ यांसारख्या चळवळींमुळे झालेली जागृतीही महत्त्वाची होती.

विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात महाराष्ट्रात ग्रामीण व बहुजन नेतृत्व पुढे येऊ लागले. त्यावेळी महाराष्ट्रात प्रथमच सहकारी तत्त्वांचा आणि सहकारी मार्गाचा विचार पुढे येऊ लागला. भारतात १९०४ मध्ये निकल्सन यांच्या प्रयत्नांमुळे प्रथमच सहकार चळवळीच्या संदर्भात पहिला कायदा झाला. हा सहकार कायदा शेतकऱ्यांचे हित लक्षात घेऊनच करण्यात आला होता. एकोणिसाव्या शतकाचा उत्तरार्ध आणि विसाव्या शतकाचा प्रारंभ हा सहकार चळवळीच्या विचारांचा आणि बीजारोपणाचा होता. १९०४ च्या कायदयातील काही उणिवा दूर करण्यासाठी १९१२ साली सहकार कायदयात दुरुस्त्या करण्यात आल्या. दुरुस्त कायद्यान्वये सहकार हा विषय केंद्र सरकारकडून प्रांतिक सरकारकडे सोपविण्यात आला. हा बदल सहकार चळवळीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण ठरला. त्यामुळे लोकप्रतिनिधींचा प्रत्यक्षपणे सहकार चळवळीशी संबंध येणे शक्य झाले. लोकांचा सहकार चळवळीकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलला आणि तिच्याविषयी अपेक्षा वाढल्या. त्यानुसार मुंबई सरकारने १९२५ साली पहिला प्रांतिक सहकार कायदा केला. यामुळे सहकार चळवळीची नैतिक पातळी उंचावली. सहकार चळवळ ही सामान्यांची असमान्य चळवळ झाली.

वैकुंठभाई मेहता, धनंजयराव गाडगीळ, वि.म. दांडेकर यांसारख्या विचारवंतांनी सहकार चळवळीची पाळेमुळे घट्ट केली. त्यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्रात सहकार चळवळ विकसित झाली. विठ्ठलराव विखे-पाटील, मामासाहेब मोहोळ, रत्नाप्पा कुंभार, यशवंतराव चव्हाण, तात्यासाहेब कोरे, वसंतदादा पाटील, शंकरराव मोहिते-पाटील, अण्णासाहेब मगर, राजारामबापू पाटील, अप्पासाहेब पवार, शरद पवार यांसारख्या नेत्यांनी सहकारी आर्थिक प्रकल्पांची उभारणी करून सहकार चळवळीला अधिक बळ दिले. या नेत्यांनी महाराष्ट्रातील वेगवेगळ्या तालुक्यांमध्ये सहकारी तत्त्वावर साखर कारखाने, कुक्कुटपालन, दुग्धव्यवसाय, सूतगिरण्या, फळबाजार, घरबांधणी, विक्री व्यवस्था, पतपुरवठा, मासेमारी, शिक्षणसंस्था, मजूरसंस्था, वाहतूक संस्था यांसारख्या संस्थांची उभारणी करून ग्रामीण व शहरी भागाच्या विकासास हातभार लावला. या नेत्यांनी आपापल्या भागांमध्ये सहकाराच्या माध्यमातून विविध सहकारी संस्था

उभारून त्या वाढविल्या. त्यामुळे तेथील शेतकऱ्यांना जोडधंदे मिळून त्यांच्या जीवनमानाचा दर्जा उंचावला. या सर्व नेत्यांनी आपापल्या जिल्ह्यांचा विकास केला. पर्यायाने महाराष्ट्राचा विकास होऊन सहकार चळवळ यशस्वी झाली. या नेत्यांच्या सहकार चळवळीतील कार्याचा विचार दुसऱ्या प्रकरणात केलेला आहे.

'अण्णासाहेब मगर : अल्पपरिचय' या शीर्षकाच्या प्रकरण तीनमध्ये अण्णासाहेबांच्या जीवन पटाविषयी माहिती दिलेली आहे. अण्णासाहेब मगर यांचे कुटुंब पुणे जिल्ह्यातील हडपसर या गावातील होते. त्यांच्या वडिलांचे नाव धोंडो मथाजी मगर, तर आईचे नाव लक्ष्मीबाई होते. त्यांची वडिलोपार्जित शेती होती. अण्णासाहेब मगर यांच्या वडिलांकडे हडपसर गावची पाटीलकी असल्यामुळे त्यांच्या घरी लोकांचा नेहमी राबता असे. त्यामुळे लहानपणापासूनच अण्णासाहेबांना समाजकार्याची आवड होती. ते सधन शेतकरी कुटुंबातील होते. अण्णासाहेबांचा जन्म २६ एप्रिल १९१९ या दिवशी वाघोली येथे त्यांच्या आजोळी सातववाड्यात झाला. त्यांच्या घरचे वातावरण धार्मिक असल्यामुळे त्यांच्यावर धार्मिक संस्कार झाले. अण्णासाहेबांचे प्राथमिक शिक्षण १९२९-३० च्या दरम्यान 'बंटर स्कूल, हडपसर' येथे झाले. माध्यमिक शिक्षण 'न्यू इंग्लिश स्कूल, रमणबाग' येथे, तर उच्च शिक्षण 'फर्ग्युसन कॉलेज, पुणे' येथे झाले. पुढे त्यांनी 'कृषी महाविद्यालय, पुणे' येथून १९४४ मध्ये बी.एस्सी. (ॲग्री) ही पदवी संपादन केली. कॉलेजमध्ये असतानाच त्यांनी १९४२ च्या 'छोडो भारत' चळवळीत सहभाग घेतला होता. १९४७ मध्ये अण्णासाहेबांच्या वडिलांचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. तेव्हा वडिलांनंतर संपूर्ण घराची जबाबदारी अण्णासाहेबांवर आली. त्यामुळे त्यांनी आयुष्यभर अविवाहित राहून आपला कुटुंबवत्सलपणा सिद्ध केला. अण्णासाहेब सुरुवातीपासूनच कॉंग्रेस पक्षाशी एकनिष्ठ होते. त्यांचा स्वभाव अत्यंत धाडसी व हजरजबाबी होता. त्यामुळे सरकारदरबारीही त्यांचा दबदबा होता. स्वतःच्या कष्टांवर, कर्तृत्वावर व नि:स्वार्थी वृत्तीवर त्यांचा विश्वास होता. समाजकार्य करण्यासाठी राजकारण हे अण्णासाहेबांचे माध्यम होते.

अण्णासाहेब फार स्वाभिमानी वृत्तीचे होते. आपले धेय गाठण्यासाठी त्यांची कितीही कष्ट करण्याची तयारी असे. त्यांची स्मरणशक्ती इतकी दांडगी होती की, राजकारणात सक्रीय असताना कधीही

त्यांना पी.ए.ची गरज पडली नाही. ते कधी डायरी वापरत नसत. कार्यकर्त्यांची नावे, फोन नंबर त्यांचे पाठ असायचे. कोणालाही दिलेली वेळ त्यांच्या हातून कधीही चुकत नसे. या गोष्टींचे अनेक नेत्यांना आश्चर्य वाटत होते. पुणे जिल्ह्यामध्ये अण्णासाहेबांनी सहकाराच्या माध्यमातून अनेक संस्था उभारल्या. त्या वाढविण्यासाठी सुरुवातीचे कष्ट त्यांनी घेतले. त्यांनी उभारलेल्या संस्था आजही यशस्वीपणे सुरू आहेत. अण्णासाहेबांनी सामाजिक, राजकीय, सहकारी, शैक्षणिक क्षेत्रांमध्ये मोलाचे योगदान दिले. २५ जून १९७९ या दिवशी हृदयविकाराच्या झटक्याने त्यांना मृत्यू आला तेव्हा ते खासदार होते.

'अण्णासाहेब मगर यांचे शैक्षणिक क्षेत्रातील योगदान' या शीर्षकाच्या चौथ्या प्रकरणात त्यांनी शैक्षणिक क्षेत्रात केलेल्या कार्याविषयी माहिती देण्यात आलेली आहे. अण्णासाहेब मगर यांनी सामाजिक, राजकीय, सहकारी क्षेत्रांबरोबर शैक्षणिक क्षेत्रातही बहुमोल कामगिरी केली. पुणे जिल्ह्यातील हवेली तालुक्याच्या ग्रामीण भागात अण्णासाहेबांनी शैक्षणिक संधी उपलब्ध करून दिल्या. हवेली तालुका हा हरित-क्रांतीबरोबरच शैक्षणिक क्रांतीद्वारे प्रगत व्हावा यासाठी त्यांनी प्रयत्न केले. १९७१ मध्ये अण्णासाहेबांनी पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे अध्यक्ष बाबुरावजी घोलप यांच्या मार्गदर्शनाखाली 'कला व वाणिज्य महाविद्यालय, हडपसर' स्थापन केले. त्यांनी 'बंटर स्कूल, हडपसर' येथील इमारतीमध्ये १३३ विद्यार्थ्यांनिशी हे महाविद्यालय सुरू केले. अण्णासाहेबांनी सुरुवातीला अनेक अडचणींना यशस्वीपणे तोंड दिले; परंतु ग्रामीण भागातील विद्यार्थी हे शहराच्या तुलनेत कोठेही कमी पडता कामा नयेत ही त्यांची तळमळ होती. त्यांनी खेड्यांतील विद्यार्थ्यांना शिक्षणाचे चांगले क्षेत्र निर्माण करून दिले होते. अण्णासाहेबांच्या या कार्याबद्दल यशवंतराव चव्हाण यांनी पुढील उद्गार काढले, 'अण्णासाहेब मगर यांचे व्यक्तिमत्व सर्वांगसुंदर होते. कामगार क्षेत्र असो, सहकार क्षेत्र असो, राष्ट्रीय चळवळ असो की शिक्षण क्षेत्र असो, सर्वच क्षेत्रांत अण्णासाहेबांनी अतिशय कुशलतेने आणि जिद्दीने कार्य केले.' अण्णासाहेबांनी या महाविद्यालयाच्या विकास-विस्तारासाठी विशेष प्रयत्न केले. त्यांनी हडपसर महाविद्यालयाच्या स्वतंत्र वास्तूसाठी 'सुभाष सामुदायिक सहकारी शेतकी संघ, मांजरी' यांच्याकडून पाच एकर जागा वाजवी मोबदल्यात घेतली. हडपसर महाविद्यालय सुरू करून ग्रामीण भागातील युवक-युवतींना शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून दिल्या. त्यामुळे ग्रामीण आणि शहरी भागातील तफावत दूर होण्यास मदत झाली. अण्णासाहेब मगर यांनी या महाविद्यालयाच्या वाढीसाठी, विकासासाठी घेतलेल्या परिश्रमांची जाण ठेवून

१९८४ मध्ये या महाविद्यालयास 'अण्णासाहेब मगर महाविद्यालय, महादेवनगर' असे नाव देण्यात आले. त्याचप्रमाणे रयत शिक्षण संस्थेचे 'साधना विद्यालय' यासाठी अण्णासाहेबांनी जागा मिळवून दिली. भारतीय कृषी उद्योग प्रतिष्ठान, उरुळीकांचन या संस्थेच्या विद्यमाने 'चिंतामणी विद्या मंदिर', थेऊर येथे यशवंत सहकारी साखर कारखान्याकडून निधी मिळवून देऊन त्यांनी या विद्यालयाची स्थापना केली.

१९७० साली पिंपरी-चिंचवड नगरपालिकेची स्थापना झाली. त्यावेळी या भागातील अनेक गावांमध्ये जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळा होत्या. काही ठिकाणी मिशनरी शाळा होत्या. या सर्व शाळा अण्णासाहेबांच्या प्रयत्नाने २ जुलै १९७३ रोजी नगरपालिकेकडे वर्ग करण्यात आल्या. तेव्हा त्यांनी शाळांच्या नवीन इमारतींच्या बांधकामांना चालना दिली. १९७५-१९७६ पर्यंत अण्णासाहेबांच्या प्रयत्नांमुळे सर्व गावांतील शाळांच्या इमारती आधुनिक पद्धतीने बांधण्यात आल्या. नगरपालिका भागातील प्रत्येक गावामध्ये त्यांनी शाळा सुरू केल्या. तसेच प्रत्येक गावात शिक्षणाच्या संधी उपलब्ध केल्या. पिंपरी-चिंचवड भागातील शाळांच्या स्थापनेवरून गावांच्या वाढीचा विकासक्रम लक्षात येतो. ते शैक्षणिक कामांमध्ये वैयक्तिक लक्ष घालत असत. अण्णासाहेब मगर यांनी पुणे जिल्ह्यातील ग्रामीण भागात शैक्षणिक सुविधा पुरविल्यामुळे त्या भागांचा शैक्षणिक दृष्टीने विकास झाला. अण्णासाहेबांच्या कार्याचे हे फलितच म्हटले पाहिजे. त्यांच्या शैक्षणिक कार्यातून सहकार चळवळीचे एक विधायक रूप प्रकटले.

प्रकरण पाचवे हे 'अण्णासाहेब मगर यांचे सामाजिक आणि सहकार क्षेत्रातील कार्य' अशा शीर्षकाचे आहे. यामध्ये अण्णासाहेबांनी केलेल्या सामाजिक व सार्वजनिक कार्याबरोबरच सहकारी संस्थाची विस्तृत स्वरुपाची माहिती दिलेली आहे. अण्णासाहेब मगर हे शेतकरी कुटुंबातील असल्यामुळे शेतकऱ्यांच्या समस्या व गरजा ते ओळखून होते. शेतकऱ्यांनी केलेल्या कष्टाचा योग्य तो मोबदला त्यांना मिळाला पाहिजे अशी त्यांची भूमिका होती. त्यादृष्टीने त्यांनी सहकाराच्या माध्यमातून वेगवेगळ्या संस्था उभारल्या. अण्णासाहेबांना लहापणापासूनच सामाजिक कार्याची आवड असल्यामुळे त्यांचा समाजातील प्रत्येक स्तरांतील लोकांमध्ये वावर असे. त्यांनी समाजकार्यासाठीच राजकारण केले. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना त्यांनी शेतीबरोबरच जोडधंदा करण्यास प्रोत्साहन दिले. शेतीसाठी शासनाच्या अनेक योजना खेड्यांपर्यंत पोहोचविल्या. त्यामुळे शेतकऱ्यांचे उत्पादन वाढून त्यांच्या प्रगतीस हातभार लागला.

अण्णासाहेबांमुळे हवेली तालुक्यातील शेतकरी बागाइतदार झाला. १९६१ मध्ये पानशेतचे धरण फुटले तेव्हा संपूर्ण पुणे शहरावर आपत्ती आली होती. त्यावेळी यशवंतराव चव्हाण यांनी ही परिस्थिती पूर्वपदावर आणण्याची जबाबदारी अण्णासाहेबांवर टाकली होती. त्यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे अत्यंत कमी कालावधीत या भागातील जनजीवन सुरळीत झाले होते. पानशेतच्या आपत्तीमध्ये ज्या लोकांचे नुकसान झाले त्यांना शासनाकडून मदत मिळवून देण्यापासून ते घरे मिळवून देण्यापर्यंत सगळी कामे अण्णासाहेबांनी केली. अण्णासाहेबांकडे कोणतीही व्यक्ती मदतीसाठी गेल्यास ते त्या व्यक्तीचे नियमात बसणारे काम लगेच करत असत. याच गोष्टींमुळे लोकांचा त्यांच्यावर विश्वास होता. नियमात न बसणारी कामे त्यांनी कधीच केली नाहीत. म्हणून त्यांच्याबद्दल लोकांमध्ये, नेत्यांमध्ये आदरयुक्त भीती होती. आयुष्यभर हीच दृष्टी बाळगून त्यांनी समाजकार्य केले. अण्णासाहेब मगर यांनी तालुका पातळीवर शेतकऱ्यांना सहकाराच्या माध्यमातून दर्जेदार बी-बियाणे, खते, औषधे पुरविण्यासाठी १९६३ साली 'हवेली तालुका खरेदी-विक्री संघा'ची स्थापना केली. या संघाची कापड दुकाने, रेशनिंग दुकाने होती, त्याचप्रमाणे पेट्रोल, डिझेल पंप होते. संपूर्ण पुणे जिल्ह्यातील शेतकऱ्यांना या संघाकडून मिळणाऱ्या गोष्टींचा फायदा होत असे. पुढे अण्णासाहेब मगर यांनी हवेली तालुक्यातील शेतकऱ्यांच्या हितासाठी १९६६ साली 'यशवंत सहकारी साखर कारखाना', थेऊर येथे उभारला. या कारखान्यामुळे शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारली. अण्णासाहेबांच्या प्रयत्नाने कारखाना कार्यक्षेत्रात पाण्याची उपलब्धता वाढल्यामुळे आजूबाजूच्या परिसरातील शेतकरी ऊसाबरोबरच शेतामध्ये फळभाज्या, पालेभाज्या अशी पिके घेऊ लागले. पर्यायाने शेतकऱ्यांची आर्थिक प्रगती सुधारण्यास मदत झाली.

भारत स्वतंत्र झाल्यानंतर भारताच्या सर्वांगीण विकासाचा विचार सुरू झाला. भारतात नवनवे प्रकल्प उभारले जाऊ लागले. स्वतंत्र भारताच्या गरजा लक्षात घेऊन स्वयंपूर्णतेचा विचार होऊ लागला. त्यावेळी पिंपरी-चिंचवड येथे औद्योगिक विस्तार वाढून १९६५ पर्यंत येथे अनेक कंपन्या स्थिरावल्या. तेव्हा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी औद्योगिक वाढीचा विचार करून हवेलीचे आमदार अण्णासाहेब मगर यांची भेट घेऊन औद्योगिक विकासाची जबाबदारी त्यांच्यावर सोपविली. पिंपरी-चिंचवडमध्ये उद्योग स्थिरावल्यामुळे तेथे नागरीकरण वाढले. त्यावेळी अण्णासाहेबांनी या भागाच्या विकासासाठी नगरपालिका व्हावी, अशी शासनाकडे मागणी केली. या कामामध्ये अण्णासाहेबांच्या

प्रयत्नांमुळे १९७० मध्ये 'पिंपरी-चिंचवड नवनगरपालिका' अस्तित्वात आली. नगरपालिकेच्या माध्यमातून अण्णासाहेबांनी लोकांच्या गरजा भागविल्या. पिंपरी-चिंचवड शहराला येथील कारखानदारीमुळे 'औद्योगिकनगरी' असे संबोधण्यात येते. १९६२ ते १९७० हा काळ उद्योगधंद्यांच्या दृष्टीने महत्त्वाचा होता. त्यावेळी कामगार भरतीचे काम जोरात सुरू होते. त्यामुळे महाराष्ट्र व अन्य भागांतील लोक या भागात आकर्षित झाले. नोकरी मिळाल्यानंतर लोक याच भागात स्थिरावले. १९७०-१९७१ चा काळ हा उद्योगधंदे आणि कामगार यांच्या दृष्टीने स्थिर होण्याचा काळ होता. १९७१ नंतर कामगार संघटना अधिक बळकट होऊन व्यवस्थापनाशी संघर्ष करू लागल्या. १९७१ मध्ये अण्णासाहेब इंटकचे अध्यक्ष असताना कामगारांचे प्रश्न अतिशय कुशलतेने सोडवत असत. प्रसंगी कठोर निर्णय घेत. अण्णासाहेब १९७७ पर्यंत इंटकचे अध्यक्ष होते.

पिंपरी-चिंचवड भागात औद्योगिकीकरणाबरोबरच नागरीकरणही वाढले. त्यामुळे नागरीकरणाच्या समस्याही वाढू लागल्या. त्यावेळी अण्णासाहेबांनी सॅटेलाइट टाऊन (उपनगरीय शहर) ची शासनाकडे शिफारस केली. तेव्हा शासनाची परवानगी घेऊन अण्णासाहेबांनी १९७२ मध्ये 'नवनगरविकास प्राधिकरणा'ची स्थापना केली. त्यानंतर त्यांनी नवनगरासाठी जमीन संपादित करणे, ती विकसीत करणे, त्या जागेवर सर्व सेवा-सुविधांसह विविध उत्पन्न गटांसाठी गृहबांधणी प्रकल्प उभारणे या सर्वांद्वारे नवनगराचा विकास साधला. पिंपरी-चिंचवड भागात वाढत्या शहरीकरणामुळे स्थानिक लोकांनी अण्णासाहेबांकडे सहकारी बँक सुरू करण्याची मागणी केली. त्यानुसार अण्णासाहेबांनी सर्व स्तरांतील लोकांना एकत्र घेऊन शहराचे मध्य ठिकाण म्हणून चिंचवड येथे १९७३ मध्ये 'पवना सहकारी बँक' स्थापन केली. या बँकेमार्फत कमी व्याजदरात पतपुरवठा करून लोकांना छोटे-मोठे उद्योग, घरबांधणी अशा वेगवेगळ्या कामांसाठी कर्जपुरवठा केला. अण्णासाहेब मगर यांनी स्थापन केलेल्या पिंपरी-चिंचवड नवनगरपालिचे दहा वर्षांच्या आत महानगरपालिकेत रूपांतर झाले. आशिया खंडातील सर्वांत श्रीमंत महानगरपालिका म्हणून ही महानगरपालिका ओळखली जाते.

पुणे जिल्ह्याचे वेगाने वाढलेले औद्योगिकीकरण व लोकसंख्या यांमुळे जिल्ह्यात अनेक गोष्टींची कमतरता भासत होती. त्यावेळी अण्णासाहेब पुणे जिल्ह्याचे नेतृत्व करत होते. अण्णासाहेबांनी

शेतकऱ्यांची होणारी पिळवणूक जवळून पाहिली होती. शेतकरी त्यावेळी हताश होऊन सर्व गोष्टी सहन करत असत. शेतकरी कष्ट करूनही आर्थिकदृष्ट्या कमकुवत होता, तर याऊलट केवळ शेतकऱ्यांनी आणलेल्या मालावर व्यापारी सधन झाले होते. ही तफावत अण्णासाहेबांना दूर करावयाची होती. १८८६ च्या ब्रिटिश कालखंडामध्ये पुण्यात मंडई होती, तिला लॉर्ड रे यांचे नाव दिले होते. पुढे १९३८ मध्ये प्रल्हाद केशव अत्रे नगरपालिकेचे सभासद असताना त्यांनी ते नाव बदलून 'महात्मा फुले मंडई' असे केले. मंडईची एवढी मोठी वास्तू त्या काळात हिंदुस्थानात कोठेही नव्हती. पुण्याच्या वाढत्या लोकसंख्येमुळे ही मंडई अपुरी वाटू लागली. त्यावेळी अण्णासाहेबांनी व्यापाऱ्यांचा विरोध पत्करून शेतकऱ्यांच्या हितासाठी १९७५ मध्ये 'श्री छत्रपती शिवाजी मार्केटयार्ड, पुणे' स्थापन केले. या मंडईमध्ये शेतकरी आपला माल थेट व्यापाऱ्यांना विकत, त्यामुळे त्यांची पिळवणूक थांबून शेतकऱ्यांना आर्थिक सुबत्ता आली. पर्यायाने हवेली तालुक्यातील शेतकरी सुखी झाले.

'अण्णासाहेब मगर यांचा राजकीय सहभाग' हे सहाव्या प्रकरणाचे शीर्षक असून यामध्ये अण्णासाहेबांनी राजकारणाच्या माध्यमातून केलेले कार्य अभ्यासण्यात आलेले आहे. अण्णासाहेब मगर हे विद्यार्थीदशेपासूनच सामाजिक कार्यात सहभागी होते. १९४२ च्या आंदोलनात अण्णासाहेब सहभागी झाले होते. तेव्हापासून ते काँग्रेस पक्षामध्ये सक्रिय होते. समाजकार्य करण्यासाठी राजकारण हे प्रभावी माध्यम आहे, हे अण्णासाहेब जाणून होते. १९४४ मध्ये शिक्षण पूर्ण झाल्यावर त्यांनी नोकरी किंवा वडिलोपार्जित शेती न करता स्वतःला समाजकार्यात झोकून दिले. अण्णासाहेबांनी काँग्रेस पक्षात सहभागी होऊन हडपसर भागात अनेक यशस्वी विकासकामे केली, त्यामुळे त्यांना पुणे जिल्ह्याचे नेतृत्व करण्याची संधी मिळाली. १९४७ मध्ये त्यांची 'पुणे जिल्हा काँग्रेस कमिटी'च्या चिटणीसपदी निवड झाली. पुढे स्वतंत्र भारताच्या पहिल्या (१९५२) विधानसभेच्या निवडणुकीत दौंड-हवेली मतदारसंघातून अण्णासाहेब निवडून येऊन आमदार झाले. आमदार असताना त्यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे विशेष लक्ष पुरविले. १९५७ मध्ये विधानसभेची दुसरी निवडणूक झाली, तेव्हा संपूर्ण महाराष्ट्रात काँग्रेसविरोधी वातावरण होते. त्यामुळे या निवडणुकीत अण्णासाहेबांचा पराभव झाला. पराभवाने खचून न जाता त्यांनी आपले कार्य चालूच ठेवले. १९५७ मध्ये अण्णासाहेब 'महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी'चे अध्यक्ष झाले. तेव्हा सलग दहा वर्षे ते अध्यक्ष होते. पुढे १९६२ मध्ये विधानसभेची तिसरी निवडणूक हवेली मतदार संघातून लढवून अण्णासाहेब

निवडून आले. ते १९६३-१९६४ मध्ये 'पुणे जिल्हा कॉंग्रेस'चे अध्यक्ष होते. आमदार असताना अण्णासाहेबांनी पुणे जिल्ह्याच्या विकासाच्या दृष्टीने पावले उचलली. शेतकऱ्यांचे उत्पादन वाढविण्यासाठी शास्त्रोक्त पद्धतींचा अवलंब करण्यास शेतकऱ्यांना प्रवृत्त केले.

अण्णासाहेब मगर हे १९६७ च्या चौथ्या विधानसभेच्या निवडणुकीस खेड मतदारसंघात उभे राहून विजयी झाले. त्यावेळी हवेली तालुक्यातील लोकांना आपल्या घरचा उमेदवार निवडून आल्याची भावना होती. अण्णासाहेब हवेलीतील प्रत्येक गावांत आणि गावांतील प्रत्येक घरातील व्यक्तींच्या भेटी घेत असत; त्यामुळे अण्णासाहेब लोकांना नेते म्हणून कमी, तर घरची व्यक्ती म्हणून जास्त जवळचे वाटत असत. आमदार असताना त्यांनी हवेलीतील शेतकऱ्यांसाठी इरिगेशनची योजना आणून शेतकऱ्यांच्या पाण्याचा प्रश्न सोडविला होता. त्यानंतर विधानसभेच्या १९७२ च्या निवडणुकीत ते चौथ्यांदा आमदार झाले. अण्णासाहेबांनी राजकारणात असताना कधीही नकारात्मक भाषणे केली नाही. त्यांनी पुणे जिल्ह्यात कॉंग्रेस पक्ष बळकट केला होता. त्यांचे राजकीय जीवनातील वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी फक्त स्वतःच्या मतदारसंघाचा कधीही विचार केला नाही, तर संपूर्ण जिल्ह्याच्या विकासाचा ते विचार करत असत. त्यामुळे ते लोकप्रिय नेते होते. अण्णासाहेबांनी शैक्षणिक धोरण, दुष्काळग्रस्तांना मदत, शेतीविकास अशी अनेक विधायक कामे केली. अण्णासाहेबांचे काम एवढे मोठे होते, की त्यांनी पुढे १९७७ मध्ये खेड लोकसभा मतदारसंघातून निवडणूक लढवून १,५८,९४७ मते मिळविली. त्यावेळी संपूर्ण जिल्ह्यातून अण्णासाहेब हे कॉंग्रेसचे एकमेव उमेदवार निवडून आले होते. अण्णासाहेबांच्या कारकीर्दीत ते एकूण चार वेळा (वीस वर्षे) आमदार होते. अण्णासाहेब खासदार असताना व सामाजिक, राजकीय क्षेत्रात कार्यरत असताना २५ जून १९७९ या दिवशी पुणे येथे हृदयविकाराच्या झटक्याने त्यांचा मृत्यू झाला.

अण्णासाहेबांनी अत्यंत कमी कालावधीमध्ये पुणे जिल्ह्याचा उल्लेखनीय विकास घडवून आणला. त्यांनी पुणे जिल्ह्यात वेगवेगळ्या संस्था उभारून त्या वाढविल्या, संस्थांमधील कामगारांचे हित जपले. त्यांची जिद्द आणि प्रामाणिकपणा यांमुळे समाजातील प्रत्येक स्तरांतील लोकांमध्ये त्यांचा दबदबा होता. अण्णासाहेबांच्या जीवनात त्यांच्यावर कधीच कोणी गंभीर आरोप केले नाहीत. त्यांनी उभारलेल्या संस्थांमध्ये अनेकांना रोजगार मिळून पुणे जिल्ह्यातील लाखो कुटुंबे सुखी झाली. त्यांचे वैयक्तिक गुणही

असामान्य होते. कुशाग्र बुद्धिमत्ता, गुणग्राहकता, निरीक्षण व स्मरणशक्ती, व्यवहारकुशलता, कार्यमग्नता, सौजन्य, शिस्तप्रियता, धाडसी वृत्ती, शुद्ध आचरण, साधी राहणी, चिंतनशीलता, मनमिळावू स्वभाव, स्थितप्रज्ञवृत्ती या गुणांद्वारे अण्णासाहेबांच्या स्वभावाचे दर्शन होते.

ना. शरद पवार यांनी अण्णासाहेबांबद्दल बोलताना पुढील शब्दांमध्ये अण्णासाहेबांचा मोठेपणा सांगितला - " [अण्णासाहेब मगर हे] ग्रामीण नेतृत्व करणारा नेता होते, कुशल संघटक होते, स्वच्छ चारित्र्याचे होते, पुणे जिल्ह्यात काँग्रेस पक्ष बळकट करणारे होते, खेड्यांमधून नेतृत्व घडविणारे होते, कार्यकर्त्यांचे नेतृत्व करणारे नेते होते , संस्था वाढविणारे होते, पुणे जिल्ह्याची वर्षानुवर्षे चांगली घडी बसविणारे नेते होते. [He was a] man of organization. "

अण्णासाहेबांबद्दल अनेक लोकांनी, नेत्यांनी 'पुणे जिल्ह्याचे शिल्पकार', 'पुणे जिल्ह्याचे भीष्माचार्य', 'संस्था वाढविणारा संस्थानिक', 'सहकारमहर्षी', 'कर्मयोगी अण्णासाहेब' असे गौरवोद्गार काढले.

प्रस्तुत संशोधनाचे निष्कर्ष पुढीलप्रमाणे -

## निष्कर्ष

(१) खंडप्राय आणि कृषिप्रधान अशा भारतात आधुनिक काळात सहकार चळवळ विकसित झाली. ही चळवळ आणि ग्रामीण व बहुजन नेतृत्व यांचे परस्पर-संबंध व परस्पर-प्रभाव महत्त्वपूर्ण आहेत. सहकार चळवळीने विशेषतः खेड्यांच्या आणि पर्यायाने महाराष्ट्राच्या व भारताच्या विकासाला हातभार लावला. आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासामध्ये या चळवळीचे महत्त्वपूर्ण योगदान आहे.

(२) सहकार ही मानवाची स्वाभाविक प्रवृत्ती आहे. मानवाची समाजशीलता आणि प्रगती यांच्या मुळाशी ही प्रवृत्ती आहे. स्वेच्छेने व समभावाने एकत्र येणे, समान उद्दिष्टे साध्य करणे, समान हितसंबंधांची परिपूर्ती साधणे, त्यासाठीची व्यवस्था लोकशाही पद्धतीने राबवणे आणि पर्यायाने समाज-विकासाला हातभार लावणे यातून सहकार चळवळ साकार झाली.

(३) महाराष्ट्रातील सहकार-चळवळ टप्प्याटप्प्याने विकसित होत गेली. भारतात १९०४ साली निकल्सन यांच्या प्रयत्नातून झालेला सहकार संस्थांविषयीचा पहिला कायदा हा या चळवळीतील महत्त्वपूर्ण आरंभकालीन टप्पा होता. या कायद्यातील त्रुटी दूर करण्यासाठी त्यामध्ये १९१२ साली महत्त्वाची दुरुस्ती करण्यात आली. मुंबई सरकारचा १९२५ सालचा पहिला 'प्रांतिक सहकारी कायदा' हा पुढचा महत्त्वाचा टप्पा होता. सहाकर चळवळीस नैतिक बैठक प्राप्त करून देण्याच्या दृष्टीने हा कायदा उल्लेखनीय होता. महाराष्ट्रात सहकारी चळवळीचा पाया बळकट करण्यात वैकुंठभाई मेहता, धनंजयराव गाडगीळ आणि विठ्ठलराव विखे-पाटील यांचे महत्त्वपूर्ण योगदान होते. १९४९ साली अहमदनगर जिल्ह्यातील प्रवरानगर येथे विठ्ठलराव विखे-पाटील यांनी उभारलेला भारतातील पहिला सहकारी साखर कारखाना हा सहकार चळवळीच्या विकासातील महत्त्वपूर्ण असा मैलाचा दगड (mile-stone) होता.

(४) महाराष्ट्रातील सहकार-चळवळीला वैकुंठभाई मेहता, डॉ. धनंजयराव गाडगीळ, विठ्ठलराव विखे-पाटील, मामासाहेब मोहोळ, रत्नाप्पा कुंभार, यशवंतराव चव्हाण, तात्यासाहेब कोरे, वसंतदादा पाटील, शंकरराव मोहिते-पाटील, राजारामबापू पाटील, अप्पासाहेब पवार, शरद पवार इत्यादी व्यक्तींनी महत्त्वपूर्ण योगदान दिले. सहकारी तत्त्वावर साखर कारखाने, मजूरसंस्था, वाहतूक संस्था, विक्रीव्यवस्था, दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन, मासेमारी, फळबाजार, पतपुरवठा, घरबांधणी, शिक्षणसंस्था यांसारख्या संस्थांची उभारणी करून ग्रामीण व शहरी अर्थव्यवस्थेत त्यांनी सहकारी मार्गाचा अवलंब केलेला आहे. त्यामुळे महाराष्ट्रात सहकारी अर्थकारणाने मोठ्या प्रमाणात प्रगती केलेली आहे. स्वराज्याचे सुराज्यात रूपांतर करण्याच्या प्रयत्नात सहकार चळवळीचा मोठा हातभार लागलेला आहे. काळाच्या ओघात या चळवळीने विविध चढउतार अनुभवले. तिच्यामध्ये काही दोषसुद्धा निर्माण झाले. उदाहरणार्थ, घराणेशाही व भ्रष्टाचाराचे गालबोट तिला लागले. अलीकडच्या काळात या चळवळीचे आरोग्य मंदावल्यासारखे वाटते. त्यामुळे तिला संजीवनी देण्याबाबतचे विचारमंथन चालू असल्याचे दिसते.

(५) सहकार चळवळ महाराष्ट्रातील खेड्या-पाड्यांमधून रुजल्यामुळे आणि तिला लोकशाहीचा पाया असल्यामुळे विसाव्या शतकात ग्रामीण व बहुजन नेतृत्वाच्या विकासाला या चळवळीने चालना दिली. तसेच या नवोदित नेतृत्वाने काळाच्या ओघात सहकार चळवळीला बळकटी दिली. सहकार चळवळ आणि ग्रामीण-बहुजन नेतृत्व यांच्या परस्पर-पूरकतेचा आधुनिक महाराष्ट्रातील लोकजीवनावर महत्त्वपूर्ण ठसा उमटलेला आहे. महाराष्ट्रातील राजकारणावर तर या चळवळीचा प्रभाव पडलाच ; परंतु आर्थिक-सामाजिक व शैक्षणिक विकासालासुद्धा तिने चालना दिली. त्यामुळे आधुनिक महाराष्ट्राची जडणघडण समजावून घेताना सहकार चळवळीचा तिच्या गुण-दोषांसह विचार करणे अपरिहार्य ठरते.

(६) महाराष्ट्रातील, विशेषतः पुणे जिल्ह्यातील सहकार चळवळीत हडपसर येथील शेतकरी कुटुंबातील अण्णासाहेब धोंडो मगर (१९१९-१९७९) यांचे महत्त्वपूर्ण योगदान होते. ध्येयवादी, निःस्वार्थी आणि सततोद्योगी वृत्तीमुळे अण्णासाहेब मगर यांनी राजकारण, समाजकारण, अर्थकारण इ. क्षेत्रांमध्ये आपली छाप उमटवली. 'हडपसर गाव काँग्रेस कमिटी'च्या चिटणीस पदापासून 'खेड मतदारसंघा'च्या खासदारकीपर्यंत विविध पदे त्यांनी भूषविली आणि पुणे जिल्ह्यात सहकार चळवळ विकसित करण्यात महत्त्वाची भूमिकाही बजावली. थेऊर येथील 'यशवंत सहकारी साखर कारखाना' हे त्याचे ठळक उदाहरण होय. अण्णासाहेबांचे नेतृत्व हे ग्रामीण भागातून उदयास आलेले बहुजनाभिमुख व विधायक नेतृत्व होते. विविध प्रकारच्या संस्थांचे जाळे त्यांनी उभारले, पिंपरी-चिंचवडच्या अभ्युदयासाठी अथक प्रयत्न केले आणि सहकारी चळवळीचे माध्यम दूरदर्शीपणे वापरून समाजहित साधले. अण्णासाहेब मगर हे सुमारे वीस वर्षे आमदार, तर आयुष्याच्या अखेरच्या टप्प्यात खासदार होते. आपल्या दीर्घ राजकीय सहभागाद्वारे लोकहित साधून विधायक राजकारणाचा वस्तुपाठच त्यांनी घालून दिला.

(७) अण्णासाहेब मगर यांचे नेतृत्व आणि कार्य लक्षात घेताना काही महत्त्वाची वैशिष्ट्ये जाणवतात. उदाहरणार्थ, हवेली तालुक्यातील हडपसर परिसरात 'हरित क्रांती' आणि 'शैक्षणिक क्रांती' या दोहोंवर त्यांनी भर दिला. त्यामुळे भौतिक प्रगती आणि बौद्धिक प्रगती यांचा समन्वय त्यांच्या

कार्यातून साधला गेला. त्यांच्या शैक्षणिक कार्यातून सहकार चळवळीचे एक सकारात्मक रूप प्रकटले. एकाच वेळी सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष आणि त्याच कारखान्यातील कामगार संघटनेचेही अध्यक्ष अशी दुहेरी भूमिका अण्णासाहेब मगर यांनी यशवंत सहकरी साखर कारखाना चालवताना दीर्घकाळ पार पाडली. त्यामुळे मालक आणि कामगार यांच्यातील सलोख्याचा आणि सहकाराचा एक आदर्श नमुना प्रस्थापित झाला. अण्णासाहेबांच्या या भूमिकेमुळे इंटकसारख्या राष्ट्रीय संघटनेतसुद्धा ते विधायक भूमिका वठवू शकले.

(८) सहकार चळवळीने आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासावर आपला ठसा उमटवला. या चळवळीतून उदयाला आलेल्या ग्रामीण-बहुजन नेतृत्वाचे एक विधायक रूप अण्णासाहेब मगर यांच्या रूपाने प्रकटले.